# प्रसिद्धी विभाग २०१९ – २०

## कला मंडळ

पुढारी

# शाहिरी लोकसंस्कृतीतील मानाचे पान : प्रा. शिवाजी शेळके

**राजगुरुनगर** : लोककला, लोकसंस्कृतीने समाजजागृतीचे कार्य केले असून, शाहिरी काव्य हे लोकसंस्कृतीतील मानाचे पान आहे, असे प्रतिपादन प्रा. शिवाजी शेळके यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित कला मंडळाचे उद्घाटन प्रसंगी शाहिरी काव्याचे प्रबोधनातील योगदान या विषयावर ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एच. एम. जरे होते. या वेळी कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. ए. जी. कुलकर्णी, डॉ. के. बी. सोनवणे, कला मंडळ प्रमुख प्रा. के. जे. लांडेपाटील, प्रा. दिलीप मुळूक, डॉ. बी. डी. अनुसे उपस्थित होते.

प्रा. शिवाजी शेळके म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज हे शाहिरांचे स्फूर्तिस्थान होते. त्यांनी निर्माण केलेले स्वराज्य, त्यासाठी लढणारा मराठी माणूस पोवाड्याचा विषय झाला. मुद्रणकलेपूर्वी प्रसारमाध्यम म्हणून पोवाड्यांचा वापर होत असे. तमाशा ही शाहिरांनी निर्माण केलेली परंपरा असून गण, गवळण, बतावणी, वगनाट्याबद्दल त्यांनी माहिती दिली.

My Gramin Edition
15 Sep, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com

सकाळ

# शाहिरी हे संस्कृतीतील मानाचे पान : प्रा. शेळके

राजगुरुनगर, ता. ११ : ''लोककला, लोकसंस्कृतीने समाजजागृतीचे कार्य केले असून, शाहिरी काव्य हे लोकसंस्कृतीतील मानाचे पान आहे,'' असे गौरवोद्‌गार पुण्याच्या अरविंद तेलंग महाविद्यालयाचे प्रा. शिवाजी शेळके यांनी काढले.

ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात कला मंडळाच्या उद्‌घाटनप्रसंगी 'शाहिरी काव्याचे प्रबोधनातील योगदान' या विषयावर बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एच. एम. जरे होते. या प्रसंगी उपप्राचार्य डॉ. ए. जी. कुलकर्णी, डॉ. के. बी. सोनवणे, कला मंडळप्रमुख प्रा. के. जे. लांडेपाटील, प्रा. दिलीप मुळूक, डॉ. बी. डी. अनुसे उपस्थित होते.

प्रा. शेळके म्हणाले, ''स्वराज्यनिर्मिती, स्वदेश व स्वधर्म रक्षणासाठी मराठी माणूस तयार करण्याचे काम पोवाड्याने केले. मुद्रणकलेच्या अगोदर प्रसारमाध्यम म्हणून पोवाड्याचा वापर होत होता. तमाशा ही शाहिरांनी निर्माण केलेली कलापरंपरा आहे.'' या वेळी त्यांनी पोवाडे सादर केले. त्यांना तबल्यावर साथसंगत यश तनपुरे याने दिली. प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. के. ज. लांडेपाटील यांनी केले. प्रा. अनिल कुलकर्णी यांनी आभार मानले.

Pune, District-Today
12/09/2019 Page No. 7

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख